नियमीत फौजदारी खटला क्र. **९५/२०१९**
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **अनिकेत रमेश नाईक** |
| वय सुमारे | : | ३१ वर्षे, व्यवसाय : मजूरी |
| निवासस्थान | : | मु. किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत:**

दि. ०९/१२/२०१८ रोजी मला मांडवा सागरी पोलीस ठाण्यातील म्हात्रे पोलीस यांनी पोलीस ठाण्यात पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. त्या दिवशी आरोपी क्र. ०१ झिराडकर हिच्या घराचा पंचनामा करायचा होता. त्यावेळेला आमच्यासोबत एक पंच आणि पोलीस होते. आम्ही सर्व झिराडकर यांच्या घराचा पंचनामा करण्यासाठी सोबत गेलो. झिराडकर झिराड या गावी राहते.

०२. झिराडकर यांचे घर १० **x** १० ची खोली होती. ते घर सिमेंटमध्ये बांधलेले होते. पोलीसांनी आरोपी क्र. ०१ च्या घराची झडती घेतली. तेथे काहीही मिळून आले नाही. पंचनामा सकाळी ११.१५ वाजता सुरु झाला व १२.०० वाजता संपला. मला आता पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. ०२ वर माझी सही आहे. पंचनामा **निशाणी क्र. २२** वर आहे. आरोपी क्र. ०१ आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. एन्. एम्. वहाळकर यांचेमार्फत</u>** :

०३. मी साक्ष देण्यापूर्वी पंचनामा वाचलेला नाही. मी आरोपी क्र. ०१ ला तिच्या घरी पाहिले नाही. मी आरोपी क्र. ०१ ला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याची वेळ मागाहून टाकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावरील सह्या पोलीस ठाण्यात केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

समक्ष श्रवणोत्तर स्वीकृत

( **श्रीमती एस्.डी. सोनी** ) ( **श्रीमती एस्.डी. सोनी** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.
अलिबाग.
दिनांक : **११/०६/२०२४.**

नियमीत फौजदारी खटला क्र. **९५/२०१९**
निशाणी क्र. **२९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **राजन मनोहर कोळी** |
| वय सुमारे | : | ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | चेंबुर, माहुलगांव, मुंबई |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>:**

घटना सन २०१७ मध्ये झाली होती. त्यावेळी मी माझ्या आईसोबत सुकी मच्छी विकायला जात होतो. मी माझ्या कुटुंबासोबत देवदर्शनासाठी जात होतो. आम्ही जी टुरिस्ट गाडी भेटेल त्या गाडीने जायचो. त्यानंतर आम्हाला धनंजय अरविंद झिराडकर याचेकडे चौकशी केली असता त्याने सांगितले की तो दादर ते पुणे अशी टुरिस्ट गाडी चालवतो. आम्ही त्याला एक १–२ भाडे असेच दिले होते. त्यामुळे माझी व धनंजयची मैत्री झाली. त्यानंतर आम्ही नेहमी भेटायचो व बोलायचो.

०२. सन २०१७ मध्ये नोव्हेंबर महिन्यात मला त्याचा फोन आला व त्याने मला सांगितले की, त्याचा भाऊ पवन गौडा याची गाडी खराब झालेली आहे तू २० हजारची मदत कर, मी ते तुला परत देईन. त्यावेळी माझ्याकडे पैसे नव्हते. मी माझ्या आईचे मंगळसूत्र भावना ज्वेलर्स येथे गहाण ठेवून त्याला रुपये २० हजारची मदत केली. त्यानंतर त्यांनी सांगितले की १० ते १५ दिवसांनी भावाकडून घेवून पैसे परत देतो. त्याने मला पैसे परत दिले नाहीत. मी त्याला सतत विचारपूस करत होतो. तो म्हणाला की, पवन गौडा याने मला अद्याप पैसे दिलेले

नाहीत त्याने पैसे दिले की मी लगेच तुला परत करतो.

०३. त्यानंतर काही महिन्यांनी त्याचा मित्र संजय याच्या गाडीचा अपघात झाला. त्यानंतर त्याने मला ९० हजार रुपये संजय व त्याची गाडी सोडविण्यासाठी मागितले. माझ्याकडे तेवढी रक्कम नव्हती. तरीही मी भावना ज्वेलर्सकडे जावून ९० हजार रुपयांची मागणी केली. त्यांनी मंगळसूत्राच्या रक्कमेनुसार ७६ हजार रुपये मला दिले. ती रक्कम मी धनंजय झिराडकर याला दिली. त्यानंतर मी पवन गौडा यांना चेंबुरमध्ये भेटलो. मी त्याला पैशांबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की, त्याने सदरचे पैसे धनंजय झिराडकरला कधीच दिलेले आहेत. तू दिसला नाहीस म्हणून मी सदरचे पैसे धनंजयकडे दिले.

०४. त्यानंतर मी धनंजयला फोन केला व पैशांबाबत विचारणा केली की, तुला पवन गौडाने पैसे दिले की नाहीत. त्यावर त्याने हो असे म्हटले. तो मला पैसे देणार होता पण त्याच्या आईची तब्येत ठिक नसल्याने मी तिला २० हजार दिले. धनंजय महाबळेश्वर येथे होता. मी त्याच्याशी फोनवर बोललो होतो. तो महाबळेश्वरहून आल्यानंतर मला घरी येवून भेटला व मला म्हणाला की, मी पैसे देणार होतो पण आईची तब्येत खराब असल्याने मी पैसे आईकडे दिलेले आहेत.

०५. त्यानंतर तो मला थोड्या दिवसांनी त्याच्या घरी घेवून गेला. मी त्यांना पैशाबाबत विचारण्यासाठी गेलो होतो परंतु तेथे पैशांबाबत विषय निघाला नाही. त्याच्या घरात आईवडील होते. त्यांची ओळख करुन दिली व त्यांच्या घराबाहेर डी.वाय्. सुपरिटेंडंट ऑफ लॅन्ड म्हणजेच सर्व्हे ऑफीसर यांच्या नावाची पाटी लावली होती. अरविंद वासुदेव झिराडकर याच्या नावाची डी.वाय्. सुपरिटेंडंट ऑफ लॅन्ड अशी पाटी लावली होती. त्यामुळे माझे २० हजाराचे बोलणे राहून गेले.

०६. थोड्या दिवसांनी धनंजय अरविंद झिराडकर माझ्या घरी मुंबई येथे आला. आम्ही गप्पागोष्टी केल्या. त्यांनी मला सांगितले की, माझे वडील सर्व्हे ऑफीसर आहेत ते आपल्याला स्वस्त दरात उरण येथील जासई येथे जमीन मिळवून देतील. त्यामध्ये माझे वडील अरविंद झिराडकर यांनी २० लाख रुपये त्या जमिनीत गुंतवलेले आहेत आणि दिलीप भोईर हे माझे छोटम काका त्यांनीही ५० लाख रुपये त्यामध्ये गुंतवलेले आहेत. त्यांना तेथे गाडीचे शोरुम उघडायचे आहे. पण माझे वडील अरविंद झिराडकर यांच्यावर आयकर विभागाची झडती झाली होती. म्हणून मी, माझ्या वडीलांनी व आईने तुला ऑफर केलेली आहे. तू जमिनीमध्ये गुंतवणूक कर. हे सर्व त्याने मला माझ्या घरी येवून सांगितले.

०७. त्यानंतर माझ्या निदर्शनास आले की, त्याच्या घराबाहेरील नेम प्लेटवर अरविंद झिराडकर डी.वाय्. सुपरिटेंडंट ऑफ लॅन्ड असे लिहीलेले असल्याने मी पटकन गुंतवणूक करण्यास होकार दिला. त्याच्या चारचाकी वाहनावर देखील महाराष्ट्र शासन अशी नेमप्लेट होती. त्यामुळे मी त्याला होकार दिला व दोन दिवसांमध्ये त्याच्या आईवडीलांना भेटायला गेलो. तेथे धनंजय झिराडकर व त्याची आई अर्चना अरविंद झिराडकर हे घरी होते. मी त्यांच्याकडे जमिनीबाबत चर्चा करायला गेलो.

**सरतपास मध्यान्हामुळे तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **२१/०७/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

**<u>मध्यान्हानंतर पुढील सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u> :**

०८. मी त्यांच्याबरोबर जमिनीची चर्चा केली तेव्हा त्यांनी मला सहा लाख रुपये भरण्यास सांगितले होते. पण माझ्याकडे तेवढी रक्कम नव्हती. मी कधी ५० हजार तर कधी रुपये एक लाख आणि माझ्याकडील ठेवलेले रुपये दोन लाख अशी एकूण रक्कम रुपये सहा लाख मी पूर्ण केली. कधी मी माझ्या स्वतःच्या घरी तर कधी मी अलिबाग झिराड, आदर्श नगर येथे अर्चना अरविंद झिराडकर यांच्या घरी थोडे थोडे करुन पूर्ण सहा लाख रुपये दिले होते.

०९. त्यानंतर मी माझ्या घरी गेलो. थोड्या दिवसांनी अर्चना झिराडकर यांनी मला फोन करुन माझी खुशाली विचारली. त्यानंतर मी त्यांना जमिनीच्या व्यवहाराबाबत चर्चा करत होतो. ते मला म्हणाल्या की, सर्व्हे ऑफीसमध्ये काम करणारे पाटील यांच्याकडे तुझ्या जमिनीचे पत्रव्यवहार करणार आहे, तू काळजी करु नको, तुझे काम होणार. त्या व्यवहारात धनंजय याचे वडील व माझे भाऊजी दिलीप भोईर यांनी पत्रव्यवहारात लक्ष दिलेले आहे. तुझे काम लगेच होणार.

१०. त्यानंतर मी थोड्या दिवसांनी झिराड येथे गेलो. त्यांच्या आई व धनंजय झिराडकर दोघांशी जमिनीच्या व्यवहाराबाबत बोलण्याकरीता गेलो. ते म्हणाले तुझे काम होईल. त्यानंतर त्यांच्या आईने मला विचारले तू कुठे कामाला आहेस. मी सांगितले मी आईसोबत मच्छी विकायला जातो. ते म्हणाले माझ्या पतीला विचारुन तुझ्या नोकरीबाबत विचारतो, तुझी लाईफ बदलून जाईल. त्यानंतर थोड्या दिवसांनी मी परत त्यांच्याकडे गेलो. त्यांनी मला सांगितले की, तुझ्यासाठी

काम आणलेले आहे. महाराष्ट्र शासन भू अभिलेखन येथे नोकरीसाठी तीन लाख रुपये भरायचे आहेत. पण मी त्यांना म्हणालो की, एवढी रक्कम माझ्याकडे नाही. मी त्या कामासाठी होकार दिला होता. मी धनंजय व त्याची आई अर्चना झिराडकर यांना म्हणालो की माझ्याकडे एवढी रक्कम नाही मी थोडे थोडे पैसे देणार. त्या दोघांनी सांगितले की चालेल.

११. मी त्यानंतर १५ दिवसानंतर धनंजय याला मुंबई येथे पैसे घेण्यासाठी बोलावले. मी त्याला १,५०,०००/— रुपये दिले. थोड्या दिवसांनी मी त्याच्या घरी जमिनीच्या व्यवहाराबाबत बोलण्यासाठी गेलो. त्यांची आई म्हणाली की मी तुझे ७० हजार रुपये रजिस्ट्रेशनसाठी भरलेले आहेत ते रजिस्टेशनचे पैसे कधी देतोस? मी त्यांना म्हणालो की सहा लाख रुपये मी इथून तिथून कर्ज काढून घेतलेले आहेत. पहिला तो व्यवहार क्लीयर करु द्या. त्यानंतर त्या मला रागावून बोलू लागल्या की, मला माझे ७० हजार रुपये दे. मी त्यांना कामासंदर्भात विचारले की, मी दिड लाख रुपये दिलेले आहेत. त्यावेळी धनंजय व त्याची आई घरी होती. ते म्हणाले की, धनंजयचे वडील घरी नसतात. ते सतत कामामध्ये व्यस्त असतात. त्यांचा पैशाचा व्यवहार असो किंवा पत्रव्यवहार असो, सर्व मीच बघते. त्यानंतर मी घरी गेलो.

१२. धनंजय माझ्या घरी आला व म्हणाला की, तीन जागा भू अभिलेखनासाठी रिक्त आहेत. मी त्याला म्हणालो की, माझ्या मावशीचा मुलगा भावेश विश्वनाथ भोईर हा पण काम शोधतोय. त्याला आईवडील नव्हते व तो मावशीकडे राहात आहे. मावशीचे नाव सुमन पाटील आहे. मी सदर बाब माझ्या मावशीला कळवली की, तीन लाख रुपये भरावे लागतील. माझ्या मावशीने पैसे

भरण्यास होकार दिला. मावशी सुमन पाटील हिने स्वत:चे दागिने विकले व फंडातून व इतर ठिकाणाहून पैसे जमा करुन तीन लाख रुपये धनंजय याला दिले. त्यानंतर पैसे दिल्यानंतर मी झिराडला गेलो व विचारले की काम कधीपर्यंत होणार? त्याने सांगितले की, २० दिवस तरी काम होण्यासाठी लागतील.

१३. त्यानंतर आम्हाला थोड्या दिवसांनी रत्नागिरी येथे भू अभिलेखनचे प्रशिक्षणासाठी टुरिस्ट गाडीने घेवून जाण्यास धनंजय तयार झाला. त्यानंतर रात्री ९.०० वाजता मी, धनंजय, भावेश भोईर व माझ्या काकाचा मुलगा विजय कोळी असे टुरिस्ट गाडीने निघालो. धनंजय जी गाडी चालवित होता त्या गाडीने आम्ही निघालो होतो. साधारणपणे आम्ही पुण्यापर्यंत पोहोचल्यावर अंदाजे ५० कि.मी. अंतरावर त्याला फोन आला. तो फोनवर बोलला व आमच्याशी बोलला. त्याने सांगितले की, साहेब सुट्टीवर गेलेले आहेत, तुम्ही परत मुंबईला जा. त्यानंतर आम्ही मुंबईला आलो. साधारणपणे १० दिवसांनी पुन्हा धनंजय हा आम्हाला रत्नागिरी येथे घेवून गेला. त्याने माझी व भावेश भोईरची लक्ष्मण नावाच्या व्यक्तीसोबत भेट करुन दिली. आम्ही भू अभिलेखन प्रशिक्षणासाठी गेलो होतो. तेथे मी व भावेश भोईर यांने प्रत्येकी १३ हजार रुपये प्रशिक्षणासाठी धनंजयकडे दिले. त्यानंतर धनंजय आत जावून लक्ष्मणशी बोलला व नंतर माझ्याशी बोलला. त्याने सांगितले की, इथे व्यवस्था बरोबर नाही, साहेब बाहेरगावी गेलेले आहेत ते लवकर येणार नाहीत व परत आम्हाला मुंबईला घेवून निघाला. तेव्हा मला व भावेश भोईर याला फसवणूक झाल्यासारखे कळले.

१४. त्यानंतर आम्ही मुंबई येथे आलो. त्यानंतर मी त्याच्या आईला म्हणालो आमचे पैसे परत द्या. त्यानंतर तो व त्याची आई फोन उचलत नसत. त्यामुळे मी झिराड या गावी त्यांच्या घरी गेलो. त्यानंतर मी माझ्या कामाचे पैसे व

जमिनीच्या व्यवहारासंदर्भात विचारणा केली. धनंजयने मला जासई उरण ह्या गावाचे ७/१२ उताऱ्याची प्रत दिली. त्यामध्ये माझे नाव होते. त्यांनी मला सांगितले की, ते चेक कर, तुझे नाव आता आलेले आहे, तू काळजी करु नको. ते पेपर घेवून मी जासई या गावी जागेवर गेलो. तेव्हा तेथे राज कोळी नावाची व्यक्ती होती. तो तेथे भेटला. मी त्याला विचारपूस केली की माझे नाव ७/१२ वर आहे. तो म्हणाला की कोणीतरी तुला फसवले आहे, पाहिजे तर तू तलाठी कार्यालयात जावून चेक करु शकतोस. त्यानंतर मी तलाठी कार्यालयात गेलो व सर्व्हे क्रमांकावरुन अर्ज करुन प्रत घेतली. तेव्हा मला कळले की माझी खूप मोठी फसवणूक झालेली आहे. ती जागा राज कोळी यांचे नावे होती.

१५. मी सतत धनंजय व त्याच्या आईला फोन करुन पैसे मागत असे परंतु ते फोन उचलत नव्हते. त्यानंतर मी त्यांच्या घरी गेलो व विचारणा केली. मी त्यांना सांगितले की, दिलेले कागदपत्र सर्व खोटे आहेत, मला माझे पैसे पूर्ण करा. मी त्यांना माझ्या कामाचे, जमिनीचे व भावेश भोईर यांच्या कामाकरता दिलेले पैसे परत मागितले. मी त्यांना सांगितले की, लवकरात लवकर सर्व पैसे परत करा. त्यावेळी धनंजय नव्हता. धनंजयची आई मला म्हणाली की धनंजय कुठे आहे ते मला माहीत नाही तो बॅंगलोरला गेला असावा. त्यानंतर त्या मला म्हणाल्या की, मी तुझे पैसे थोड्या दिवसात देते आता सध्या इलेक्शन आहे. थोडे दिवस थांब मी स्वत: बॅंगलोरला जावून त्यांची जमीन विकून तुझे पैसे परत करेन.

१६. अर्चना अरविंद झिराडकर यांचे जुने नाव भारती रमेश गौडा असे होते. तिने सांगितले की, धनंजय हा तिच्या पहिल्या पतीचा मुलगा आहे. धनंजयची गावी जमीन आहे. त्याचा जो हिस्सा आहे तो विकून मी तुला पैसे देईन. त्यानंतर

मी तेथून घरी परत आलो. थोड्या महिन्यांनी मी पैशाबद्दल विचारले. त्यानंतर ते माझा फोन उचलत नसत व उडवाउडवीची उत्तरे देत होते. त्यानंतर मी स्वत: त्यांच्या घरी गेलो व खूप विनवणी केली व माझे पैसे मागितले. परंतु ते पैसे देण्यास तयार नव्हते. धनंजयची आई बोलत होती की माझा मुलगा कुठे आहे हे मला माहीत नाही. मी त्यांना पैसे द्या असे सांगितले. त्यांनी सांगितले की, मी पैसे देणार नाही, तुला जे काही करायचे ते कर. मग मी जवळच्या पोलीस ठण्यात फिर्याद दिली. मला फिर्याद दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३०** देण्यात येते.

१७. मी पोलीसांना पेन ड्राईव्ह व धनंजयच्या घराबाहेर जी पाटी लावली होती त्याचा फोटो दिला होता. त्याच्या वडीलांच्या कारवर महाराष्ट्र शासनाची नेमप्लेट होती त्याचा फोटोही दिला होता. मी त्याच्या वडीलांचे आय्.डी. प्रुफ जे गाडीवर डॅश बोर्डवर असायचे ते दिले होते. तसेच अरविंद झिराडकर, धनंजय झिराडकर व अर्चना झिराडकर यांचे एकत्र असलेल्या फोटोची झेरॉक्सही दिली होती. मी रेशन कार्डची झेरॉक्स दिली. फोटोची प्रत माझ्याकडे आहे व पेन ड्राईव्ह माझ्याकडे असेल. मी सर्व रक्कम रोख स्वरुपात दिली होती फक्त १० हजार रुपये बॅंकेमार्फत ट्रान्सफर केल्याची पावती माझ्याकडे आहे. मी १० हजार रुपये धनंजय याने दिलेल्या खाते क्रमांकावर ट्रान्सफर केले होते. धनंजय व त्याची आई चेकने पैसे घेत नव्हते, ते रोखीने व्यवहार करण्यास सांगत असत. मी अर्चना यांना पाहिल्यास ओळखू शकतो. आज त्या कोर्टात हजर नाहीत. (आरोपीच्या वकीलांनी आरोपीची ओळख आव्हानीत केली नसल्यामुळे आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज मंजूर

करण्यात आलेला आहे.)

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. एन्. एम्. वहाळकर यांचेमार्फत</u>** :

१८. मला लिहीता वाचता येते. त्यावेळी माझे शिक्षण १० वी पास होते. आता माझे शिक्षण १२ वी पास आहे. ८०८२०४३८४२ हा माझा नंबर आहे. फिर्याद मी वाचून पाहिलेली होती. मी ज्या गाडीने देवदर्शनाला जात होतो त्या गाडीचा क्रमांक आता सांगू शकणार नाही. धनंजयने मला सुरुवातीला किती तारखेला पैशासाठी फोन केला होता ती तारीख आता माझ्या लक्षात नाही. मी दागिने गहाण ठेवल्याची तारीख मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दागिने धनंजय याला पैसे देण्यासाठी गहाण ठेवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मंगळसूत्र पहिल्यापासून गहाण ठेवले होते.

१९. भवानी ज्वेलर्स यांच्याकडे मी एकदाच गेलो होतो. मी मंगळसूत्र गहाण ठेवल्याबाबत बिल पोलीसांना दिले होते. धनंजयला ७६ हजार रुपये दिल्याची तारीख मला आज आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पैसे दिल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. धनंजयच्या घरी मी पहिल्यांदा कोणत्या तारखेला गेलो ती तारीख मला सांगता येणार नाही. मंगळसूत्राची अंदाजे रक्कम किती होती ते मला सांगता येणार नाही. भवानी ज्वेलर्सकडून मी एकूण २० हजार आणि ७६ हजार अशी रक्कम घेतली होती. माझ्या वैयक्तीक कारणासाठी मंगळसूत्र गहाण ठेवल्याची रक्कम मला आठवत नाही. मला त्या मंगळसूत्राची एकूण रक्कम किती मिळाली हे मला आठवत नाही.

२०. मी माझ्या लग्नासाठी ठेवलेले दोन लाख रुपये व इथून तिथून पैसे गोळा करुन व फंडातून अशी रक्कम धनंजय यांना सहा लाख व दिड लाख रुपये दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीची खरेदी विक्री रजिस्टर ऑफीसमधून होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पैसे देण्यापूर्वी जागा पाहिली नव्हती. (साक्षीदार सांगतो की, जासई येथे अरविंद झिराडकर हे सर्व्हे ऑफीसर असल्याने आम्ही ती जागा पहायला गेलो नाही.) हे म्हणणे खरे आहे की, पाटील यांना कधीही भेटलो नव्हतो.

२१. मी पहिल्यांदा रत्नागिरी येथे गेलो ती तारीख मला सांगता येणार नाही. मी दुसऱ्या वेळी रत्नागिरीला गेलो ती तारीख मला सांगता येणार नाही. मला जो ७/१२ उतारा दिला होता त्याचा गट क्रमांक आता माझ्या लक्षात नाही. अरविंद झिराडकर याचे आय्.डी. कार्ड डॅश बोर्डमध्ये पाकीटमध्ये ठेवत असत. मी त्याच्याकडून मागितले होते व त्याने मला दिले होते. कारण तो सांगत होता की टोल फ्रि असतो. मी १० हजार रुपये दिल्यासंदर्भात प्रत पोलीसांना दिली होती.

२२. मी सुकी मच्छी आईसोबत विकायला जायचो ही बाब माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. मी फिर्याद देताना पोलीसांना सांगितले होते की, गाडी खराब झालेली आहे २० हजाराची मदत कर. सदर बाब पोलीसांनी माझ्या फिर्यादीमध्ये लिहीली नाही कारण की पोलीसांनी अपघात झालेला आहे असे लिहीलेले आहे. ‘खराब’ नाही ‘अपघात’ असे पोलीसांनी लिहीलेले आहे. हे मला आठवत नाही की, मी पोलीसांना सांगितले होते किंवा नाही की, धनंजयने सांगितले होते की, भावाने पैसे दिल्यावर परत करीन. मी पोलीसांना सांगितले होते की, धनंजयने भावाची गाडी सोडविण्यासाठी पैसे मागितले होते. सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये लिहीलेली नाही कारण की नोकरी व जमिनीच्या व्यवहाराबाबतच मी

फिर्यादीमध्ये सांगितले होते. मी पोलीसांना सांगितले नव्हते की, पवनने मला सांगितले की तू दिसला नाही म्हणून मी धनंजयकडे पैसे दिलेले आहेत. मी दिलीप भोईर हे आमचे छोटम काका आहेत असे पोलीसांना सांगितले नव्हते. मी पोलीसांना सांगितले नव्हते की, अरविंद झिराडकर यांच्यावर आयकर विभागाची झडती झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, ही बाब मी पहिल्यांदाच कोर्टात सांगत आहे. मला हे आठवत नाही की, आयकर विभागाची झडती पडल्यामुळे मी, माझी आई व वडील तुला ऑफर देत आहे असे फिर्यादीमध्ये सांगितले होते किंवा नाही. मी पोलीसांना सांगितले नव्हते की, अरविंद झिराडकर याच्या गाडीमध्ये महाराष्ट्र शासन अशी नेमप्लेट होती.

२३.　　　मी पोलीसांना सांगितले नव्हते की, जमिनीबाबत व्यवहारासाठी मला सहा लाख रुपये अर्चना झिराडकरने भरण्यास सांगितले होते. मी पोलीसांना सांगितले होते की, १५ दिवसांनी बोलावून मी धनंजयला दिड लाख रुपये दिले. सहा लाख रुपये मी इकडून तिकडून जमवून दिले ही बाब मी पोलीसांना सांगितली होती. मी पोलीसांना सांगितले नव्हते की, २—३ महिन्यांनी धनंजय घरी आला. मी पोलीसांना सांगितले होते की, अर्चना हिने मला सांगितले की, धनंजयचे वडील घरी नसतात त्यांचा पत्रव्यवहार मीच पाहते.

२४.　　　हे म्हणणे खरे नाही की, मी धनंजय झिराडकर व त्याची आई यांना कोणतीही रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनंजय व त्याची आई यांनी कोणतेही कारण सांगून मला फसवलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, धनंजयच्या आईचे दागिने माझ्याकडे होते. हे म्हणणे खरे नाही की, धनंजयची आई सदरचे दागिने परत मागत होती व मी टाळाटाळ करत होतो. हे म्हणणे खरे नाही

की, त्यामुळे मी धनंजय व त्याच्या आईवर खोटा गुन्हा दाखल केलेला आहे.

२५. मला हे आठवत नाही की, मी पोलीसांना सांगितले होते की, मी तलाठी कार्यालयात जावून ७/१२ उतारा काढला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा माझे दागिने गहाण ठेवण्याशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी धनंजयकडून फसवून त्याचे वडीलांचे आय्.डी. कार्ड घेतले. हे म्हणणे खरे नाही की, धनंजयच्या आईचे दागिने परत द्यावे लागू नयेत म्हणून मी खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी रत्नागिरीला कधीही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नोकरीनिमित्ताने धनंजय व त्याची आई यांना पैसे दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२१/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **९५/२०१९**
निशाणी क्र. **३२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **भावेश विश्वनाथ भोईर** |
| वय सुमारे | : | २७ वर्षे, |
| व्यवसाय | : | बी.ए.आर.सी. ट्रॉम्बेमध्ये कंत्राटी कामगार |
| निवासस्थान | : | चेंबुर, माहुळ, कुंभारवाडा |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत:</u>**

०१. मी फिर्यादी राजन कोळी याच्या मावशीचा मुलगा आहे. माझा भाऊ राजन याने माझी ओळख धनंजय गौडा यासोबत करुन दिली. धनंजय गौडा याने माझा विश्वासघात केला. धनंजय गौडा याने माझ्याकडून ३,३०,०००/— रुपये घेतले होते. त्याने अपघात झाला, गाडी गॅरेजला आहे, मित्राचा अपघात झाला आहे अशी विविध कारणे सांगून ४० हजार, ५० हजार रुपये घेतले होते. मी त्यावेळी नोकरीला होता. मी बी.पी.सी.एल्. कंपनीत कामाला होतो. त्याने एक रुपयादेखील मला परत केला नाही.

०२. त्याने नोकरीला लावण्याच्या बहाण्याने पैसे घेतले होते. त्याने महाराष्ट्र शासन येथे नोकरीला लावतो असे सांगितले होते परंतु नोकरी काही लावली नाही. त्याने नोकरी लावण्याकरीता माझ्याकडून एक लाख रुपये घेतले होते. मी माझ्या मावशीचे सोने गहाण ठेवून त्याला एक लाख रुपये दिले होते. मी त्याला नोकरीबाबत विचारले असता तो आता होईल, नंतर होईल असे सांगत होता. त्याने आम्हाला पंढरपूर व रत्नागिरी येथे नोकरी लावतो असे सांगून घेवून गेला होता.

०३. आम्हाला नंतर समजले की, तो पूर्णपणे फ्रॉड होता. त्यानंतर तो पळून गेला. तो बोलला होता की माझे वडील महाराष्ट्र शासनामध्ये ओळख आहे. अलिबाग येथे जमीन स्वस्तात देईन. त्यानंतर तो पळून गेला.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. एन्. एम्. वहाळकर यांचेमार्फत** :

०४. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले असून मी आय्.टी.आय्. मेकॅनिकलचा कोर्स केलेला आहे. माहुळ गावात मी लहानपणापासून राहतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गौडा यांनी राजनकडून पैसे घेतल्याबाबत मला प्रत्यक्षात माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजनने किती रक्कम दिली होती हे मला माहिती नाही. मी पवनला पैसे दिल्याबाबत लिहून दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, किती पैसे कोणत्या तारखेला दिले हे मी आता सांगू शकत नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ अर्चना झिराडकरला पैसे दिले नाहीत. मी आरोपी क्र. १ च्या संपर्कात नव्हतो. आरोपीच्या गाडीचा क्रमांक मी सांगू शकत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्याची पर्सनल गाडी नव्हती. आरोपी वेगवेगळ्या गाड्या घेवून फिरत होता. पोलीसांना जबाब देताना मी सांगितले होते की, आरोपी धनंजयला मी ३,३०,०००/— रुपये दिले होते. सदर बाब माझ्या जबाबात पोलीसांनी का लिहीली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांना जबाब देताना मी सांगितले नव्हते की, त्याने अपघात झाला, गाडी गॅरेजला आहे, मित्राचा अपघात झाला आहे अशी विविध कारणे सांगून ४० हजार, ५० हजार रुपये घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, ही बाब मी आज प्रथमच कोर्टात सांगत आहे. पोलीसांना जबाब देताना मी सांगितले होते की, आरोपी धनंजयने सांगितले होते की, त्याचे वडील महाराष्ट्र शासनात नोकरीस होते. सदर

बाब माझ्या जबाबात पोलीसांनी का लिहीली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०६. पोलीसांना जबाब देताना मी सांगितले होते की, रत्नागिरी व पंढरपूर येथे आम्हाला आरोपी धनंजय घेवून गेला होता. सदर बाब माझ्या जबाबात पोलीसांनी का लिहीली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. पोलीसांना जबाब देताना मी सांगितले होते की, आरोपी मला स्वस्तात ‘अलिबाग’ येथे जमीन घेवून देणार आहे. माझ्या जबाबात फक्त ‘अलिबाग’ हा शब्द नाही. माझ्यासाठी स्वस्तात जागा घेवून देणार असे आरोपी धनंजय बोलला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी धनंजयला कोणतीही रक्कम दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी धनंजय आम्हाला कोठेही घेवून गेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०८/१२/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **९५/२०१९**
निशाणी क्र. **३६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुमन प्रदीप पाटील** |
| वय सुमारे | : | ५८ वर्षे, व्यवसाय : मासेविक्री |
| निवासस्थान | : | मालाड, मुंबई |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. घटना डिसेंबर–२०१७ मध्ये घडली. माझा भाचा राजन कोळी याचा मित्र सोन्या आहे त्याने सांगितले की, कामाला लावतो. त्या मित्राचे पूर्ण नाव मला माहिती नाही. त्याला सोन्या असे म्हणतात. राजनने मला सांगितले की, त्याने सांगितले आहे की, कामाला लावतो मला पैशाची मदत करा. मी साडेतीन लाख रुपये त्याच्यासाठी भरले होते. मी माझे दागिने मोडून पैसे दिले होते. कधी पन्नास हजार रुपये कधी एक लाख रुपये असे थोडे थोडे करुन पैसे दिले होते. मी राजन याला पैसे दिले त्याने ते पैसे सोन्या याला दिले होते. सोन्या याचे नाव धनंजय झिराडकर असे होते. नंतर राजन याने सांगितले की, तो पैसे घेवून पळालेला आहे. त्याने कामालाही लावलेले नाही.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. एन्. एम्. वहाळकर यांचेमार्फत</u>** :

०२. आरोपीने माझ्याकडे स्वत: पैसे मागितले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडे स्वत: पैसे दिलेले नाहीत. साक्षीदार सांगते की, ५० हजार रुपये त्याच्या हातात दिले होते. मी पैसे दिल्याबाबत लिखापढी केली नाही. दागिने

विकल्याबाबतच्या पावत्या मी पोलीसांना दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाचा राजन याला मदत करण्यासाठी आज मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पैसे दिलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, राजनने माझ्याकडे पैशांची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कामाला लावतो म्हणून कोणतेही पैसे मागितले नव्हते. मी पोलीसांना सांगितले नव्हते की, त्याला सोन्या असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, त्याला सोन्या म्हणतात हे मी प्रथमच कोर्टात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याला सोन्या म्हणतात हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **३०/०३/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.